महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. तंशिविकापु/लेखा १/२०२०/ 1536 दिनांक ०५/०५/२०२०

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व शासकीय संस्था (तंत्रनिकेतने/महाविद्यालये)

विषय :- कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : - ०१.महाराष्ट्र शासन, वित विभाग शासन निर्णय क्रमांक. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३,दिनांक ०४ मे २०२०.
०२.तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/वित्तीय उपाययोजना/२०२०/२०६, दिनांक ०५/०५/२०२०.

कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेवून शासनाने संदर्भाधिन क्रमांक ०१ च्या शासन निर्णयान्वये उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२००५०४१२५८४०७८०५ असा असून उपलब्ध करून घेण्यात यावा.

तंत्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्रमांक ०२ अन्वये असे निर्देश दिलेले आहेत की,शासन निर्णयातील सूचनांचे तंतोतंत पालन होईल याची संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी दक्षता घ्यावी.

त्यानुसार सर्व संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुख (आहरण व संवितरण अधिकारी) यांना कळविण्यात येते की, शासन निर्णयात कार्यक्रमावरील खर्च, अनिवार्य खर्च, न्यायालयीन प्रकरण व आधुनिकीकरण खर्च, **उणे प्राधिकारावर खर्च करण्यास प्रतिबंध, खरेदी, भांडवली/बांधकामावरील खर्च, पदभरती, संक्षिप्त देयके, अखर्चित रक्कम व स्वीय प्रपंची खात्यांमधील निधी व प्रलंबित देयके** इ.बाबत सविस्तर नमुद करण्यात आलेले आहे. तरी कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजनाबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. तसेच संस्थेस सन २०२०-२१ या वर्षात मंजूर अनुदानापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेवून तसा अनुपालन अहवाल विभागीय कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सादर.